# मेट्रो झाडे जगविणार, ३ हजार झाडे लावणार मूळ जागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने मेट्रो ३ च्या स्थानकांच्या कामाकरिता प्रभावित झालेल्या झाडांचे त्यांच्या मूळ जागी वृक्षारोपण करण्याच्या मोहिमेला सिप्झ स्थानकापासून सुरुवात झाली. यावेळी व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्या हस्ते सिप्झ मेट्रो स्थानकांतील इलेक्ट्रॉनिक्स प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा परिसरात मोहिमेचा प्रारंभ झाला. त्यामुळे झाडांची कत्तल होणार नाही तर झाडांचे मूळ जागी वृक्षारोपण करून मुंबईची हिरवळ टिकविण्याच्या कामात मेट्रो एकप्रकारे योगदानच देणार आहे.

मेट्रो-३ मधील २६ स्थानकांच्या बांधकामादरम्यान साधारण ३ हजार झाडे प्रभावित झाली होती. उच्च न्यायालयाला दिलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे कॉर्पोरेशन हे राज्यातील विविध बागांमध्ये १८ इंच परीघ असलेली तितकीच झाडे रुजवत असून मेट्रो स्थानकांच्या त्याच परिसरात मूळ जागी त्याला पुनर्स्थापित करत आहेत. वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात वृक्षारोपणातील पॅकेज १९ पासून करण्यात आली असून याअंतर्गत सीप्झ ते धारावीपर्यंतच्या १० स्थानकांचा समावेश होतो. पॅकेज १९ अंतर्गत देशी बदाम, ताम्हण (फूल) आणि पांगारा (फूल) प्रजातींसह १७ स्थानिक प्रजातींची एकूण १,०८५ झाडे लावली जातील.



## तीन वर्षे करणार देखरेख

मूळ जागी वृक्षरोपण मोहिमेला सुरुवात करून आपण पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलत असल्याचा मला आनंद होत आहे. या मोहिमेंतर्गत पुढील ३ वर्षांमध्ये बागेत रुजवलेली जवळपास ३ हजार झाडे मेट्रो स्थानकांच्या परिसरात लावून त्यांची तीन वर्ष देखरेख कॉर्पोरेशनद्वारे केली जाणार आहे, असे अश्विनी भिडे म्हणाल्या.